दूरध्वनी : २५३३१२११
२५३३१५९०

# ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महानगरपालिका भवन, सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी,पाचपाखाडी,ठाणे - ४०० ६०२.

**THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE**

संदर्भ : ठामपा/वैआअ- ५५७

दिनांक : १९/ ५/२०२५
सार्वजनिक आरोग्य विभाग

## "ना हरकत प्रमाणपत्र"

प्रति,
मुख्याध्यापक,
श्री मॉ विद्यालय,
श्री मॉ विद्यानगरी,
ऑपोझिट घोडबंदररोड,
पातलीपाडा, ठाणे.

विषय - आरोग्य स्वच्छता विषयक ना हरकत दाखला......
संदर्भ- दि. १५.०५.२०२५ रोजीचा या विभागाकडे प्राप्त अर्ज.

मुख्याध्यापक, श्री मॉ विद्यालय, ठाणे यांना शाळेसाठी ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडुन आरोग्य स्वच्छता विषयक ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. कार्यरत शाळेसाठी शुध्द व सुरक्षित पाणी पुरवठा सातत्याने उपलब्ध ठेवणे, पाणी साठवण टाक्यांच्या नियमित स्वच्छता राखणे याबावत व्यवस्थापनाने कायमस्वरुपी व्यवस्था करण्यात यावी.

१) कार्यरत शाळेच्या सॅनिटरी व वायुविजन तसेच सांडपाणी व्यवस्थेची सातत्याने देखभाल करुन ती नेहमी सुस्थितीत राहील याची व्यवस्थापनाने खबरदारी घ्यावी.
२) कार्यरत शाळेच्या प्रसाधनगृहाची स्वच्छता व दैनंदिन परिसर स्वच्छतेसाठी सफाई कामगार कायमस्वरुपी नियुक्त करावे.
३) कार्यरत शाळेमध्ये काम करणा-या नोकरवर्ग व शिक्षकवर्गाची दर सहा महिन्यांनी वैद्यकीय तपासणी करणे व्यवस्थापकास बंधनकारक राहिल.
४) कार्यरत शाळेमध्ये अग्निशमन यंत्रणा व प्रथमोपचार किटनियमित कार्यान्वित ठेवावे.
५) दर तिन महिन्यांनी पाणी साठवणुक टाकी व प्रत्यक्ष पिण्यासाठी वापरण्यात योणा-या पिण्याच्या पाण्याचा नमुना तपासणी करुन छुषित आढळल्यास योग्य ती कार्यवाही करावी.
६) ओला व सुका कचरा वेगवेगळा करुन ओला कच-यापासुन खत निर्मिती करणे व सुका कचरा कचरा वेचणा-यांना सुपूर्द करणे बंधनकारक राहिल तसेच ठाणे महानगरपालिका कचरा कुंडीत अथवा घंटागाडीत टाकणे गरजेचे राहिल.
७) सार्वजनिक आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने या कार्यालयाकडून दिल्या जाणा-या सुचनांचे, आदेशाचे पालन करण्याचे बंधन व्यवस्थापनावर राहिल.

महनगरपालिकेचे आरोग्य अधिकारी आपल्या शाळेस भेट देऊ शकतात जर तपासणीचे वेळी सुचनांचे पालन होत नाही असे निदर्शनास आल्यास सदर ना हरकत प्रमाणपत्र तात्काळ रद्द करण्यात येईल.

सदर प्रमाणपत्र सार्वजनिक आरोग्य विषयक बाबींकरिता वरील अटी व शर्तीस अधिन राहुन देण्यात येत आहे. तसेच सदर प्रमाणपत्र दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वैध राहिल. त्यांनतर ना हरकत दाखला नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहिल.

Chetna 19-5-25

(डॉ.चेतना नितिल के.)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
ठाणे महानगरपालिका ठाणे

For SRI MA VIDYALAYA.
Manager

SRI MA VIDYALAYA * THANE (W) *

PRINCIPAL
SRI MA VIDYALAYA
PATLIPADA, THANE-(W).